# वसई विरार शहर महानगरपालिका
## वैद्यकीय आरोग्य विभाग
## थेट मुलाखती (Walk in Interview)

विषय :- कोरोना विषाणू (कोविड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी वसई विरार शहर महानगरपालिकेत वैद्यकीय अधिकारी या पदासाठी करार पद्धतीने ठोक मानधन तत्वावर सेवा घेणे.

कोरोना विषाणू (कोविड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाययोजना करण्याकरिता वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात कोव्हिड-१९ रुग्णालयात आय.सी.यु. विभागाकरीता आय.सी.यु. तज्ञ वैद्यकीय अधिकारी या पदावर करार पध्दतीवर काम करण्यासाठी इच्छुक उमेद्वारांनी थेट मुलाखती (Walk in Interview) कामी वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभाग, मुख्य कार्यालय येथे त्यांचे अर्ज संपूर्ण तपशिलासह त्वरीत सादर करावेत.

| अ.क्र. | पदनाम | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | मासिक एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी (आय.सी.यु. तज्ञ भिषक) | आवश्यकतेनुसार | मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.बी.बी.एस., एम.डी. (मेडीसीन) किंवा समकक्ष पदवी आणि व महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडील नोंदणी प्रमाणपत्र | Negotiable |
| २ | वैद्यकीय अधिकारी (एम.बी.बी.एस) | ३० | मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.बी.बी.एस पदवी आवश्यक व संबंधित मेडिकल कौन्सिलची नोंदणी आवश्यक तसेच ३ वर्षाचा आय.सी.यु. विभागाचा अनुभव आवश्यक. | Negotiable |
| ३ | वैद्यकीय अधिकारी (बी.ए.एम.एस.) | २० | मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.ए.एम.एस. पदवी आवश्यक व इंडियन मेडिकल कौन्सिल कडील नोंदणी प्रमाणपत्र. तसेच ३ वर्षाचा आय.सी.यु. विभागाचा अनुभव आवश्यक. | Negotiable |
| ४ | वैद्यकीय अधिकारी (बी.एच.एम.एस.) | २० | मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.एच.एम.एस. पदवी आवश्यक व महाराष्ट्र कौन्सील ऑफ होमिओपॅथी कडील नोंदणी प्रमाणपत्र. तसेच ३ वर्षाचा आय.सी.यु. विभागाचा अनुभव आवश्यक. | Negotiable |

अर्ज करण्याची पद्धत :-

**वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभाग, चौथा मजला, प्रभाग समिती - सी,** बहुउद्देशीय इमारत, विरार (पूर्व) येथे संपूर्ण तपशिलासह दि.१८/०७/२०२० ते दि.३१/०७/२०२० पर्यत सकाळी ११ वाजता या वेळेत अर्ज सादर करावा. सार्वजनिक सुट्टीचा दिवस वगळून अर्जाचा नमुना www.vvcmc.in या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेला आहे. अर्जासोबत आवश्यकती कागदपत्रे सादर करण्यात यावी.

कंत्राटी/करार पध्दतीने सेवा घेणेची पध्दत :-

अर्ज घेताना मूळ कागदपत्रांची तपासणी करुन अर्ज स्वीकारण्यात येतील. कागदपत्रांची छाननी झाल्यानंतर जे उमेदवार शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करित असतिल त्यांची थेट मुलाखतीद्वारे निवड करण्यांत येईल. थेट मुलाखती नंतर आवश्यकते प्रमाणे सदर पदांच्या उमेदवारांची सेवा घेणेत येईल.

Scanned with CamScanner

अटी व शर्ती :-

१. उपरोक्त पदांकरीता कालावधी ६ महिने किंवा कोरोना (कोविड १९) प्रादुर्भाव संपेपर्यंत, जे आधी घडले तोपर्यंत. तथापी या पुढे सुध्दा सेवा लागणार असेल तर उमेदवाराच्या सेवा, वर्तणूक इ.बाबी तपासून मुदतवाढ देण्याबातचा निर्णय मा.आयुक्त वसई विरार शहर महानगरपालिका यांनी राखून ठेवला आहे.

२. किमान ३ वर्षे आय.सी.यु. अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. अश्या अनुभवाचा दाखला जोडणे बंधनकारक आहे. तथापी या प्रमाणे उमेदवार उपलब्ध न झाल्यास यात किमान १ वर्षे ते २ वर्षे अनुभव असणाऱ्या उमेदवारांना संधी देण्यात येईल.

३. उपरोक्त पदसंख्येत वाढ किंवा घट करणेचा अधिकार मा.आयुक्त यांना राहील.

४. छाननी नंतर योग्य उमेदवारांची निवड करण्याचे अंतिम निर्णय मा.आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना राहील.

५. सदरची सेवा तात्पुरती असल्याने उमेद्वारांची निवड स्थानिक परिस्थिती व गरजेनुरुप करण्यात येणार आहे. याबाबत कोणतीही विचारणा दुरध्वनीवर करण्यात येऊ नये.

६. जिल्हा सिमा बंदी व वाहतूक बंदी विचार करता उमेद्वार हा वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात राहणारा असल्यास त्यास प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

७. मुलाखती पश्चात पात्र वैद्यकीय अधिकारी यांनी विहित नमुन्यातील करारनामा भरुन देणे आवश्यक आहे.

८. सदर उमेद्वारांना महानगरपालिका सेवेत कायम होणेकरिता हक्क सांगता येणार नाही. तसेच त्यांना कायम कर्मचाऱ्यांचे लाभ अनुज्ञेय होणार नाहीत.

९. भरती प्रक्रियेदरम्यान प्रथम येणाऱ्या उमेद्वारास प्राधान्य देण्यात येईल.

१०. निवड झाल्यानंतर ३ दिवसांत उमेदवाराने त्याची सेवा पुरवावी लागेल. तथापी उमेदवार हजर न झाल्यास ठेवण्यात आलेल्या प्रतिक्षा यादीतील पुढील उमेदवाराची सेवा घेण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

११. भरती प्रक्रियेदरम्यान सर्व अधिकार मा.आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना असून कोणत्याही टप्प्यावर भरती स्थगित करण्याचे अधिकार मा.आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांनी राखून ठेवले आहेत.

(श्री. रमेश मनाळे)
अतिरिक्त आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

जा.क्र.वविशम/वैआवि/ ६७६/2020
दिनांक : १७/०७/2020

Scanned with CamScanner